# योजना

**योजनेचे नाव :- 13 वने 7% महसूल अनुदान योजना सन 2024-2025 अंतर्गत खरीप हंगामाकारीत 50% अनुदानावर तेलवर्गीय बियाण्यावर अनुदान देणे.**

**तरतूद :- रुपये 50,000/-( अक्षरी पन्नास हजार फक्त)**

गडचिरोली जिल्ह्यातील तेलवर्गीय पिकाचे क्षेत्र वाढविण्याकरिता शेतकऱ्यांना प्रोत्साहित करणे ,त्याचप्रमाणे चांगल्या दर्जाचे प्रमाणित/सत्यदर्शक बियाण्याचा वापर करून तेलवर्गीय सोयाबीन,करडई,सूर्यफूल,मोहरी,तिळ,जवस इत्यादि पिकांच्या उत्पादनात वाढ करण्याकरिता सुटीवर बियाणे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. हा या योजनेचा उद्देश आहे. सन 2024-2025 या वित्तीय वर्षात महाबिज मार्फतीने पंचायत समितीस बियाणे पुरवठा झालेले बियाणे विक्री करतांना सुतीची रक्कम वजा उर्वरित रक्कम शेतकऱ्यांना रोखीने घेण्यात यावी.

सदर खर्च हा सन 2024-2025 या वित्तीय वर्षात 13 वने 7% च्या महसूल अनुदानांतर्गत तेलवर्गीय बियाणेवर अनुदान देणे या (101-40) लेखशीर्षकातील खर्ची भागविण्यात यावा पंचायत समिति मार्फत वाटप बियाणे दरवर्षी प्रमाणे कार्यवाही करून लेख परीक्षणसाठी आवश्यक दस्तऐवज जातं करून ठेवतील पंचायत समिती मार्फत विक्री झालेल्या बियाणेचा अंतिम अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद गडचिरोली यांच्याकडे सादर करतील.

**योजनेच्या अटी व शर्ती**

1. महाबीज/कृषि विद्यापीठ/रा.बि.नि मार्फतिने पुरवठा होणाऱ्या बियाण्यावर अनुदान देय राहील.
2. वरील योजनेच्या लाभ जंगल जंगल व्याप्त क्षेत्रातील गावातील अल्प,अत्यल्प,भूधारक,अनुसूची जाती जमाती विमुक्त व भटक्या जाती जमाती तसेच दारिद्र्य रेषेखालील शेतकऱ्यांना आवश्यक दास्तऐवज प्राप्त करून देण्यात येईल.
3. तेलवर्गीय बियानेमध्ये बियाणे अनु क्रमधील पुरवठाधारक यांचे दरपत्रकाच्या प्रती क्विंटल याप्रमाणे किंमतीच्या 50% नुसार अनुदान देय राहील.
4. एका शेतकऱ्यास जास्तीत जास्त 2 हेक्टर करीत लागणाऱ्या तेलवर्गीय बियाण्यावर अनुदान देय राहील.
5. प्रथम यैणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर साठा पुस्तिका मध्ये नोंद घेऊन नमूना 7/12 वर शेतकाऱ्यास बियाणे अनुदानित दराने वितरित करावे . त्यांची संपूर्ण जबाबदारी संवर्ग विकास अधिकारी अधिकारी यांची राहील .
6. पुरवठा संस्थेकडून पुरवठा झाल्यानंतर देयके प्राप्त करून घ्यावे व लाभार्थी सहभाग बियाणे वितरणापूर्वी घेवुन पूर्ण रक्कमेचा महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ चंद्रपूर यांना पाठवावा व तसेच कार्यालयास अवगत करावे व वितरण अहवाल या कार्यालयास सादर करावा.
7. अनु.क्र. 2 मध्ये नमूद केलेल्या अतिमध्ये जे शेतकरी येत नसतील त्यांना पूर्ण किंमतीवर बियाणे वाटप करावे व त्यांचा हिशोब वेगळा ठेवावा .

कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद गडचिरोली